<u>**निशाणी नि.दि दा. क्र. १९०/२०२२ मधील  नि क्र. ४७ वरील आदेश**</u>

CNRNOMHSNo.70011982022

प्रस्तुत अर्ज वादी यांनी मौजे हिंगणगांव, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली येथील गट क्र. ६९२ मधील शेतमिळकतीमधील वादरस्त्याबाबत प्रतिवादी करीत असलेल्या हरकत, अडथळयाबाबत पोलीस संरक्षण मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे थोडक्यात कथन असे की, वादी यांनी प्रतिवादींविरुध्द निरंतर व कारक ताकीदीसाठी दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये नि. क्र. ५ कडे तुर्तातुर्त ताकीदीसाठी अर्ज दाखल केला होता. सदर अर्जाचा गुणदोषावर दि. २४.०५.२०२४ रोजी निर्णय झाला असून वादी यांचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे. न्यायालयाने प्रतिवादी अथवा त्यांचेतर्फे इतर व्यक्तींनी मौजे हिंगणगांव येथील गट क्र. ६९२ मधील वादीचे घर व विहीरीसाठी येणे जाणेसाठी व शेतमिळकतीमध्ये येणे जाणेसाठी गट क्र. ६९२ च्या जुना बेळंकी रस्त्याच्या उत्तर बाजूने पूर्व पश्चिम चालीचा व त्यापुढे दक्षीणोत्तर चालीचा व त्या पुढे पूर्व पश्चिम चालीचा असणारा १५ फूट बैलगाडी रस्ता याचे सविस्तर वर्णन वादपत्रात परिच्छेद क्र. १ मध्ये व वादपत्रासोबतच्या हातनकाशामध्ये केलेले आहे, त्या रस्त्याची वहिवाट करण्यापासून वादीस प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी हरकत,अडथळा करु नये असा अंतरीम मनाई आदेश दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत देण्यात येतो असा आदेश न्यायालयाने केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ९ हे आडदांड प्रवृत्तीचे आहेत. त्यामुळे त्यांनी दि. १५.०७.२०२४ रोजी दावा मिळकतीमधील वादग्रस्त रस्ता पूर्णपणे नांगरुन जमीन तयार केली आहे. वादी यांनी त्याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार केली असता पोलिसांनी न्यायालयाचा आदेश असल्याशिवाय ते काही करु शकत नाहीत असे सांगितल्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदरचा न्यायालयाचा आदेश होवून सुध्दा वादीस त्याचा लाभ घेता येत नाही. वादी यांना शेतामध्ये जाणे येणे, शेती करणे अवघड झाले आहे. त्यामुळे पोलिस संरक्षण देण्याची त्यांनी मागणी केली आहे.

४. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी यांनी वादी यांचा रस्ता कधीही अडविलेला नाही. सदरचा रस्ता कधीही अस्तीत्वात नव्हता. न्यायालयाने ताकीदीचा अर्ज मंजूर केला असल्याने वादी यांनी प्रतिवादींना केवळ त्रास देण्याच्या उददेशाने सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ९ हे सदर रस्त्याने ये–जा करीत आहेत. सदर रस्त्याला पूर्वीपासून वहिवाट होती. त्यामुळे वादी यांनी केवळ काल्पनीक कारण काढून सदरचा अर्ज दिलेला आहे. वादी यांनी पोलीस स्टेशनला केलेल्या अर्जाबाबत कोणताही पुरावा जोडला नाही.

५. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी हे न्यायालयाच्या हुकुमाचा गैरवापर करीत आहेत. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या कैफियतीमध्ये नमूद केलेले पूर्वापार असलेले घर व २०१५ मध्ये बांधलेला पोर्च पाडण्याच्या तयारीत आहेत. इतकेच नव्हे तर २०१५ मध्ये बांधलेले शौचालयही वादी पाडण्याच्या तयारीत आहेत. तसा कोणताही हुकुम न्यायालयाने केलेला नाही. परंतु वादी न्यायालयाच्या हुकुमाचा गैरवापर करुन प्रतिवादी यांची मिळकत पाडण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज रदद करण्याची मागणी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी केली आहे. न्यायालयाने सदरचा अर्ज मंजूर केल्यास वादी हे प्रतिवादी क्र. १ ते ३ हे उपरोक्त नमूद केलेले घराचा पोर्च व शौचालय काढतील व तसे केल्यास प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

६. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

७. अभीलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादी यांनी निशाणी क्र. ५ अन्वये प्रतिवादी यांनी त्यांच्या वाद मिळकतीवरील उपभोगास हरकत अडथळा निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज मंजूर झाला असुन प्रतिवादी यांचे विरुध्द प्रस्तुत न्यायालयाने त्यांना वादी यांच्या उपभोगास हरकत अडथळा निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त

ताकीद दिनांक २४.०५.२०२४ रोजीच्या आदेशान्वये दिलेली आहे. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन प्रतिवादी निशाणी क्र. ५ वर झालेल्या आदेशाची अंमलबजावणी करत नसल्याचे कथन केले आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम २–अ अन्वये तुर्तातुर्त मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यानंतरची तरतुद देण्यात आलेली आहे. त्यामुळे वादी यांनी सदर तरतुदीअन्वये अर्ज दाखल करणे आवश्यक होते. वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये कोठेही त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम २–अ अन्वये अर्ज दाखल केल्याबाबत नमुद देखील केले नाही. म्हणजेच वादी यांनी त्यांना उपलब्ध असलेला उपाय न करता प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन पोलीस संरक्षणाची मागणी केल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी स्वच्छ हाताने दाखल केल्याचे दिसुन येत नाही.

८. तसेच वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये वाद मिळकतीमध्ये जाणे येणेसाठी व औजारे ने आण करण्यासाठी पोलीस संरक्षण मिळावे अशी मागणी केली आहे. परंतु शेतातील कामाची पाहणी करता सदर शेतामध्ये पेरणी, तन काढणी, पिकांची काढणी करणे अशी वेगवेगळी कामे नियमीतपणे चालु राहतात, अशा प्रत्येक कामाच्या वेळी वादी यांना पोलीस संरक्षण देणे शक्य होणार नाही. पोलीस यंत्रणेला कायदा व सुव्यवस्थेबाबत नियमीत कार्यरत रहावे लागते. जर वादी यांचा अर्ज मंजूर करुन त्यांना शेतीच्या प्रत्येक कामासाठी पोलीस संरक्षण दिले तर त्याचा परिणाम कायदा व सुव्यवसथेवर देखील होउ शकतो. यास्तव वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम २–अ अन्वये दिलेल्या तरतुदीचा अवलंब करुन प्रतिवादीविरुध्द योग्य ती दाद मागणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबीं विचारात घेता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

KADAM NUTAN SACHIN
Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2025.07.10 07:21:11 +0530

स्थळ:– कवठेमहांकाळ (एन.एस.कदम)

दि. ०९.०७.२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

कवठेमहांकाळ

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | - H.P.Haridas |
| Court | - CJJD and JMFC, Kavathemahankal. |
| Date | -09.07.2025 |
| Order signed by the Presiding Officer on | -09.07.2025 |
| Order uploaded on | -10.07.2025 |